## निशाणी क्र. ५ खालील आदेश

वादीने प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तूर्तातूर्त मनाईचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीच्या म्हणण्यानुसार मौजे शेगाव दुमाला, तालुका पंढरपूर येथील गट क्र. २७८/ब/२ क्षेत्र १ हेक्टर ६० आर. पैकी पश्चिमेकडील १ हे. २० आर. ही मिळकत प्रतिवादी क्र. १ चे पती व प्रतिवादी क्र. १ ते ४ याचे वडिल मयत बलभिम गलांडे यांना पुनर्वसनासाठी नवीन अविभक्त शर्थीवर शासनाकडून मिळालेली होती. ( सदरची मिळकत यापुढे दावा मिळकत म्हणून नमूद केली आहे. ) दिनांक २४/०६/१९९२ इ. रोजी बलभिम गलांडे याने वादीस दावा मिळकत रु.३५,०००/– ला विक्री करण्याचे ठरवून नोंदणीकृत साठेखत लिहून दिले आहे. सदर साठेखतामधील अटिनुसार विक्रीची परवानगी मिळाल्यानंतर एका महिन्याचे आत खरेदीपत्र करण्याचे ठरले होते. त्याच दिवशी वादीने मोबदला रक्कमेपैकी रु.३०,०००/– बलभिम गलांडे यांना दिले व उर्वरित रक्कम रु.५,०००/– खरेदपत्राच्या वेळी द्यायचे ठरले होते. सदर साठेखताच्या वेळी परवानगी आवश्यक असल्यामुळे सदर साठेखतामध्ये दावा मिळकतीचा कब्जा वादीला दिल्याचे नमूद केले नाही. मात्र प्रत्यक्षात बलभिम गलांडे याने दावा मिळकत त्याच वेळी वादीच्या कब्जेत दिली आहे. तेंव्हापासून वादी दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट करीत आहे. त्यानंतर दिनांक २९/०५/१९९९ इ. रोजी

बलभिम गलांडे हे मयत झाले. त्याचे पश्चात दावा मिळकतीच्या उता–याला त्याचे वारस प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्या नावाची नोंद झाली. वादी हा दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन घेण्यासाठी बलभिम गलांडे व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना वारंवार विचारत होता. मात्र प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी खरेदीपत्र करुन देण्यास वारंवार टाळाटाळ केली. वादीने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना ऑगस्ट २०१३ मध्ये खरेदीपत्र करुन देण्याविषयी विचारले असता प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी ऑगस्ट २०१३ मध्ये खरेदीपत्र करुन देण्यास नकार दिला. त्यानंतर दिनांक १९/०९/२०१३ रोजी वादीने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना लेखी नोटीस पाठवून खरेदीपत्र करुन देण्याविषयी मागणी केली, मात्र सदर नोटीस not known असा शेरा मारुन परत आली. वादी हा त्याचा कराराचा भाग पूर्ण करण्यास सदैव तयार व इच्छुक होता व आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र. १ ते ५ यांच्याविरुध्द दावा मिळकतीचे खरेदीपत्र होवून मिळण्यासाठी, दावा मिळकतीचा कब्जा कायम करण्यासाठी, वैयक्तिकरित्या दावा मिळकतीमध्ये वादीचा कब्जा नाही असा निष्कर्ष निघाल्यास दावा मिळकतीचा कब्जा मिळण्यासाठी व दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी हरकत व अडथळा करु नये म्हणून निरंतर मनाईसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे. दरम्यान प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करु नये व दावा मिळकतीची विक्री करु नये म्हणून वादीने तूतातूर्त मनाईची दाद मागितली आहे.

३. प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी निशाणी क्र.३६ ला म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. बलभिम गलांडे याने दिनांक २४/०६/१९९२ इ. रोजी अशा प्रकारे साठेखत करारपत्र लिहून दिल्याचे त्यांनी स्पष्टपणे नाकारले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार बलभिम गलांडे याने साठेखत करारपत्र वादीला लिहून दिले नव्हते. बलभिम गलांडे अगर प्रतिवादीच्या कुटूंबाला दावा मिळकत विक्री करण्याची कसलीही गरज नव्हती. दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट नसून प्रतिवादी क्र. १ ते ५ यांची कब्जेवहिवाट आहे. दिनांक १७/०२/२०१२ इ. रोजी प्रतिवादी क्र. २ मयत झाला आहे व दिनांक २४/०६/२०१३ इ. रोजी प्रतिवादी क्र. १ मयत झाला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांना ऑगस्ट २०१३ मध्ये वादीने दावा मिळकतीचे खरेदीपत्र करुन देण्याविषयी विचारणा करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. सबब या कारणास्तव त्यांनी वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

४. वादी, प्रतिवादींनी केलेली कथने, सादर करण्यात आलेला युक्तीवाद व उपलब्ध अभिलेखावरुन माझे विचारार्थ खालील वादमुद्दे निष्पन्न झाले. त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे वतीने सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | **नकारार्थी** |
| २. | सोयीचा समतोल वादीच्या वतीने आहे का ? | **नकारार्थी** |
| ३. | प्रस्तुत अर्ज नामंजूर केलेस वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे का ? | **नकारार्थी** |
| ४. | कोणता आदेश ? | **अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

५. वादीने त्याच्या अर्जाच्या पुष्ठयर्थ निशाणी क्र. ६ ला स्वतःचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच त्याने निशाणी क्र. ३ सोबत साठेखत, ७/१२ उतारा, फेरफार उतारे, नोटीस, निशाणी ४० सोबत मंडल अधिकारी, तुंगत समोरील प्रकरणामधील कागदपत्रे इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

६. प्रतिवादी क्र. ३ ने म्हणण्याच्या पुष्ठर्थ निशाणी क्र. ३७ ला शपथपत्र दाखल केले आहे.

## मुद्दा क्र. १ साठी

७. दाव्याचे संपूर्ण अवलोकन केले असता प्रतिवादी दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत व अडथळा करत आहेत अगर प्रतिवादी हे दावा मिळकत विक्री करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे स्पष्ट कथन वादीने दाव्यामध्ये मुळीच केले नाही असे दिसून येते. दाव्यामधील अशा कथनाच्या अभावी प्रतिवादी हे दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करीत आहेत अगर दावा मिळकतीची विक्री करु लागले आहेत यावर मुळीच विश्वास बसत नाही.

८. वादीने दाखल केलेल्या निशाणी ४० सोबत मंडल अधिकारी तुंगत यांच्या समोरील दावा मिळकतीच्या उता-याला प्रतिवादींच्या नावांची नोंद होणेबाबत दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रतिवादी क्र.१ ही दिनांक २४.०६.२०१३ इ. रोजी व प्रतिवादी क्र. २ हा दिनांक १७.०२.२०१२ इ. रोजी मयत झाल्याचे दिसून येते. जर प्रतिवादी क्र.१ ही जून २०१३ मध्ये मयत झाली असेल व प्रतिवादी क्र. १ हा फेब्रुवारी २०१२ मध्ये मयत झाला असेल तर वादीने त्यांना ऑगस्ट २०१३ मध्ये दावा मिळकतीचे खरेदीपत्र होवून मिळण्यासाठी कशी काय विचारणा केली व त्यांनी खरेदीपत्र करुन देण्यास कसा काय नकार दिला, हा प्रश्न निर्माण होतो. ऑगस्ट २०१३ मध्ये प्रतिवादी क्र. १ व २ हे जीवंत नसतील तर वादीने त्यावेळी त्यांना दावा मिळकतीचे खरेदपत्र होवून मिळण्यासाठीची विचारणा केली

ही बाब वादीने धादांत पणे खोटी नमूद केली आहे हे स्पष्ट होते. वादीने सदरची बाब खोटी कथित केली असल्यामुळे त्याला मनाईसारखी समन्यायी दाद (Equitable relief) मुळीच मागता येणार नाही.

९. वादीने एकीकडे दावा मिळकतीमध्ये त्याचा कब्जा आहे, असे कथन केले आहे तर दुसरीकडे वैकल्पीकरित्या दावा मिळकतीचा कब्जा मागणीची दाद मागितली आहे. यावरुन दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट आहे किंवा नाही याबाबत वादीच संभ्रमावस्थेत आहे असे दिसून येते. त्यामुळे वादीच्या या कथनांवरुन दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट आहे असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तसेच निशाणी क्र. ३ अनुक्रमांक १ ला दाखल केलेल्या दिनांक २४/०६/१९९२ इ. रोजीच्या साठेखतावरुन देखील बलभिम गलांडे याने त्यावेळी वादीला दावा मिळकतीचा कब्जा हस्तांतरीत केला असे मुळीच दिसून येत नाही. किंबहुना दावा मिळकतीचा कब्जा खरेदीपत्रावेळी द्यायचा आहे असे सदर साठेखतामध्ये नमूद केले आहे. याही कारणास्तव दावा मिळकतीमध्ये वादीचा कब्जा आहे असे मुळीच मान्य करता येणार नाही.

१०. अशा प्रकारे वरील सर्व कारणास्तव वादीस प्रस्तुतचे प्रकरण सकृत दर्शनी आहे असे मुळीच वाटत नाही. सबब मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दे क्र. २ व ३ साठी

११. दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही. ऑगस्ट २०१३ मध्ये वादीने प्रतिवादी क्र.१ व २ यांना दावा मिळकतीचे खरेदीपत्र होऊन मिळण्यासाठी विचारणा केल्याचे वादीने खोटे कथन केले आहे, हे स्पष्ट झाले आहे. तसेच दिनांक १९/०९/२०१३ इ. रोजीची नोटीस वादीने प्रतिवादी क्र. १ व २ यांना पाठवली ही देखील बाब वादीने खोटी नमूद केली आहे हे स्पष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत सोयीचा समतोल त्याच्या वतीने आहे असे मुळीच वाटत नाही. दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. वादी हा करारातील त्याचा भाग पूर्ण करण्यास सदैव तयार व इच्छुक होता असे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे तूर्तातूर्त मनाईची दाद नामंजूर केल्यास त्याचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा तूर्तातूर्त मनाईचा अर्ज फेटाळल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल असे मला वाटत नाही. परिणामी मुद्दे क्र. २ व ३ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. ४ साठी

१२. मुद्दे क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी असल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर

होण्यास पात्र आहे. सबब, या मुद्याच्या निष्कर्षार्थ मी खालील आदेश पारीत करीत आहे :

**आदेश**

१. अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : पंढरपूर.
दिनांक : ०८.०२.२०१६

( गि. सु. माने )
४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Order /Judgment are same word to word, as per the original Order /Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. M. Algundgi |
| Court | : | 4th Jt.Civil Judge Jr. Divn. & J. M. F. C. Pandharpur. |
| Date | : | 08/02/2016 |
| Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 08/02/2016 |
| Judgment/order uploaded on | : | 09/02/2016 |